I/o

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** पाथर्डी **Year (वर्ष):** 2022

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0764 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 03/08/2022 17:37 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार — **Date From (दिनांक पासून):** 13/07/2022
   **Time Period (कालावधी):** — **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/07/2022
   **Time From (वेळेपासून):** 14:45 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 17:25 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date** (दिनांक ): 03/08/2022 **Time** (वेळ): 17:15 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No.** (नोंद क्र.): 021 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 03/08/2022 17:37 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 15 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

**(b) Address (पत्ता):** पाथर्डी ते खरवंडी जाणारे रोडवर,येळी ता पाथर्डी ,पाथर्डी

**(c) In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** राहुल बाळासाहेब वायकर

**(b) Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

**(c) Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1994 **(d) Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

**(e) UID No.** (यु.आय.डी. क्र.):

**(f) Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | माळी बाभुळगाव,पाथर्डी,पाथर्डी,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | माळी बाभुळगाव,पाथर्डी,पाथर्डी,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक संजय जनार्दन बडे पोलीस अंमलदार | | | 1. उपविभागीय पोलीस अधिकारी, कार्य, शेवगाव,पाथर्डी,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादि पाथर्डी,जि.अहमदनगरदिं. 03/08/2022मी राहुल बाळासाहेब वायकर, वय-28 वर्षे, धंदा- षेती व जेसीबी रा.माळी बाभुळगाव ता.पाथर्डी जि.अहमदनगर मो.नं.9404400420.समक्ष हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील पत्त्यावर माझे कुटूंबियासह राहात असुन शेती व्यवसाय करतो. माझा मित्र नारायण बोरूडे याचेकडे जेसीबी क्रं. एम.एच.16.सी.व्ही.7624 असा असुन सुमारे दोन महिन्यापासुन सदर जेसीबी द्वारे आम्ही भागीदारीमध्ये पाथर्डी तालुक्यामध्ये व्यवसाय करतो. दिनांक 02/07/2022 रोजी आमचा जेसीबी माझ्या घरासमोर लावलेला असतांना त्यादिवशी रात्री सुमारे 11.00 वा. बडे पोलीस हे सरकारी गाडी घेवुन माझ्या घरी आले व म्हणाले तुम्ही तुमचा जेसीबी अवैधरित्या गौणखनिज खोदकामासाठी वापरतात, तुमच्यावर गुन्हा दाखल करून तुमचा जेसीबी जप्त करावा लागेल. त्यावेळी मी माझा मित्र नारायण बोरूडे यास माझ्या घराजवळ बोलावुन घेतले. आम्ही दोघांनी बडे पोलीस यांना सांगितले की, आम्ही आमचा जेसीबी अवैधरित्या गौणखनिज खोदकामासाठी वापरत नाहीत. आम्ही पाईपलाईनचे खोदकाम व शेतीचे इतर कामकाजासाठी वापरतो असे सांगितले, तरी देखील बडे पोलीस यांनी मला व माझा मित्र नारायण यास डी.वाय.एस.पी कार्यालय, शेवगाव येथे घेवुन गेले, त्याठिकाणी आमच्या को-या कागदावर सहया घेतल्या व तुमच्यावर वरीलप्रमाणे कारवाई करायची नसेल तर त्यासाठी किती पैसे दयावे लागतील ते मी मंगळवारी तुला सांगतो असे म्हणाले व आम्हाला घरी जाण्यासाठी सोडुन दिले व आम्ही घरी आलो. त्यानंतर दिनांक 05/07/2022 रोजी बडे पोलीस यांनी माझे मोबाईलवर फोन करून आमच्यावर गुन्हा दाखल न करण्यासाठी व जेसीबी जप्त न करण्यासाठी 50,000/- रूपयाची मागणी केली. आम्हाला बडे पोलीस यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक 13/07/2022 रोजी पो.नि.श्री.गोर्डे, ला.प्र.वि.अहमदनगर येथे फोनवर संपर्क करून लाचमागणी बाबत तक्रार सांगितली होती. त्या तक्रारीप्रमाणे पो.नि.श्री.गोर्डे यांनी मला दि.13/07/2022 रोजी पाथर्डी ते कोरडगाव जाणाऱ्या रोडवरील टाकळी फाटा ता. पाथर्डी येथे सुरक्षित ठिकाणी लाचेच्या रकमेसह हजर रहाणेबाबत सुचना दिली, त्याप्रमाणे मी व माझा भागीदार मित्र नारायण बोरूडे असे हजर राहिलो. तेथे पो.नि.श्री.गोर्डे हे त्यांचे स्टाफसह आले. पो.नि.श्री.गोर्डे यांनी आमचा परिचय करून घेवून त्यांचा व त्याचे सोबत असलेले पंच, स्टाफचा परिचय करून दिला. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी मी माझी तोंडी सांगितलेली तक्रार त्यांचे सापळा पथकातील पोलीस नाईक चैधरी यांचे कडुन लिहून घेतली. त्यावर मी, पो.नि.श्री.गोर्डे व पंचानी सहया केल्या. त्यानंतर माझे तक्रारी प्रमाणे पोलीस बडे हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले. पो.नि.श्री.गोर्डे यांनी मला व पंच 1 यांना पडताळणी कारवाई दरम्यान करावयाचे कारवाईबाबत सुचना दिल्या. तसेच मला व पंचाना व्हाईस रेकर्डरचे वापराबाबत माहिती देवून व्हईस रेकर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकून सदर मेमरी कार्ड माझे, दोन्ही पंचांचे व श्री गोर्डे यांचे पडताळणी कारवाईचे निवेदन रेकर्ड करण्यात आले व त्यानंतर पुन्हा व्हाईस रेकर्डर सुरु करुन तो माझे ताब्यात दिला. मला व पंच नं.1 यांना बडे पोलीस यांची येळी ता. पाथर्डी येथे भेट घेण्यासाठी 15/15 वा.चे सुमारास रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच 1 असे माझेकडील चारचाकी वाहनाने येळी ता.पाथर्डी येथील रेणुका माता मंदिर येथे गेलो.

त्याठिकाणी बडे पोलीस व माझेत शेती सबंधाने चर्चा केली. त्यानंतर बडे पोलीस यांनी पंचासमक्ष माझेकडे 50,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 40,000/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर त्यांनी मला किती वेळ लागेल, असे म्हणता मी त्यांना नारायण आला की येतो आम्ही असे म्हणालो, त्यावर बडे पोलीस यांनी येळीलाच ये मग, एका तासात ये असे म्हणाले. त्यानंतर मी पंचासह तेथुन निघुन सापळा पथक थांबले त्याठिकाणी परत आलो. त्यावेळी पंचानी व मी वरीलप्रमाणे पोनि गोर्डे यांना माहिती दिली. तसेच पोनि गोर्डे यांनी व्हाईस रेकर्डमध्ये ध्वनिमुद्रित झालेले संभाषण ऐकले. यावरून बडे पोलीस यांनी माझ्याकडे 50,000/- रूपये मागणी करून तडजोडी अंती 40,000/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळ बडे पोलीस यांच्यावर सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरले.त्यानंतर पोनि गोर्डे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी बडे पोलीस यांना लाच म्हणुन दयावयाची रक्कम 20,000 /-रु त्यात 500/-रु दराच्या 40 भारतीय चलनी नोटा माझ्या बचतीतुन हजर केल्या. त्यानंतर मला व दोन्ही पंचांना अँन्थ्रसिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचे वापराबाबत माहिती सांगून त्यांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांचे नंबर लिहुन घेतले. त्यानंतर त्या नोटांना अँन्थ्रँसिन पावडर लावण्यात येवुन आवश्यक त्या तपासण्या करण्यात आल्या व अँन्थ्रँसिन पावडर लावलेल्या नोटा माझे पन्टचे समोरील उजव्या बाजुच्या खिशात ठेवून दिल्या. त्यानंतर पोनि गोर्डे हे मला, दोन्ही पंचांना व माझा भागीदार मित्र नारायण अशांना सापळा कारवाई दरम्यान करावयाच्या कारवाईबाबत सुचना देत असतांना, दरम्यान 16/54 वा. चे सुमारास बडे पोलीस यांचा मोबाईल क्रं. 7057919333 यावरून माझ्या मोबाईलवर कल आला. त्यावेळी सदरचा फोन कल मी पंचासमक्ष रिसीव्ह करून फोनचा स्पिकर चालु करून बोलणे केले असता बडे पोलीस यांनी आला का? असे म्हणाले, त्यावर मी त्यांना नारायण आलेला नसल्याचे सांगुन तो आल्यावर तुम्हाला फोन करतो असे म्हणालो. त्यावर बडे पोलीस यांनी त्यांना दुसरे काम असल्याचे सांगुन मला लवकर येण्यास सांगितले. त्यांनतर बडे पोलीस यांचेविरुध्द येळी ता. पाथर्डी येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरले. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी मला,पंचाना, माझा भागीदार मित्र नारायण व सापळा पथक यांना सापळा कारवाईबाबत आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी मला लाच स्विकारलेनंतर ठरवुन दिलेला लाच स्विकारलेचा डावा हात डोक्यावरून फिरवावा असा नियोजित इशारा करण्यास सांगितले. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी व्हाईस रेकर्डर चालू करुन तो माझे ताब्यात देवुन मला, पंच नं.1व माझा भागीदार मित्र नारायण बोरूडे अशांना माझेकडील चारचाकी वाहनामधुन रवाना केले. आमचे पाठोपाठ पोनि गोर्डे, पंच क्रं. 2 व सापळा पथक असे शासकिय वाहनाने येवुन येळी गावचे बस स्टण्डपासुन काही अंतरावर सुरक्षित ठिकाणी शासकिय वाहन उभे केले. त्यानंतर मी बडे पोलीस यांना माझ्या मोबाईलवरून फोन केला असता त्यांनी ते टोलनाक्यावर असल्याचे सांगुन मला टोल नाक्यावर येण्यास सांगितल्याने मी माझे चारचाकी वाहनाने टोल नाक्यावर पोहचलो. सापळा पथक देखील आमचे मागोमाग त्यांचे वाहनाने येत होते. त्यावेळी तेथे बडे पोलीस त्यांच्या कडील स्विफ्ट गाडीने माझ्या गाडीजवळ येवुन काय म्हणतो असे म्हणाले त्यावर मी त्यांना चला चहा घेवु ना असे म्हणालो. त्यानंतर मी त्यांचे गाडीचे पाठीमागे माझी गाडी घेवुन येळी येथील एका चहाच्या टपरीवर आलो. आमचे मागोमाग पोनि गोर्डे, पंच क्रं. 2 व सापळा पथक असे तेथे येवुन आजुबाजूस कोणास संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावून थांबले होते. तेथे  आमचेत व बडे पोलीस यांचेत इतर विशयावर चर्चा झाली. त्यानंतर थोडया वेळाने बडे पोलीस हे त्यांच्या सोबतच्या इसमासह त्यांचे गाडीजवळ गेले व ते दोघे गाडीत बसले. बडे पोलीस यांनी गाडी चालु केली. त्यावेळी बडे पोलीस यांचे गाडीमधील बाजुच्या सिटवर बसलेल्या इसमाकडे हात करून देवुन टाक यांचेकडे असे मला म्हणाले असता बडे पोलीस यांनी गाडी चालु केलेली असल्यामुळे मी पैसे देण्याचा विचार करीत असतांनाच बडे पोलीस यांनी दयायचे तर पटकन दया, नसले तर निघा, नका टाईम घालु फालतु असे म्हणुन त्यांचेकडील चारचाकी वाहन चालु करून तेथुन वेगाने निघुन गेले. त्यानंतर मी पंच नं.1 व माझा भागीदार नारायण बोरूडे यांचेसह तिथुन निघुन रवाना केले त्या ठिकाणी परत येत असतांना पोनि गोर्डे यांचे शासकिय वाहन आमचे वाहानाचे पुढे निघाले व मला त्यांच्या मागोमाग येण्याचा इशारा केला.  त्यानंतर पाथर्डीजवळ एका सुरक्षित ठिकाणी आलो. ती वेळ 18.25 वा चे सुमारास होती. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी माझे ताब्यातील व्हाईस रेकर्डर ताब्यात घेवुन बंद केला. त्यानंतर पंच नं.1 यांनी घडले हकिकतीबाबत पोनि गोर्डे यांना माहिती दिली, त्यानंतर मी देखील माहिती दिली.थोडया वेळानंतर बडे पोलीस यांचा माझ्या मोबाईलवर फोन आला, त्यावेळी त्यांनी चांगले गददार मित्र भेटले असे म्हणाले त्यावर मी त्यांना तुमचा काहीतरी गैरसमज झालाय, मनातुन काढुन टाका असे म्हणालो असता त्यांनी मला गैरसमज योग्यच होता असे म्हणाले. त्यावरून बडे पोलीस यांना काहीतरी संशय आला असावा म्हणुन त्यांनी माझेकडुन पैसे स्विकारले नसावेत असे मी पोनि गोर्डे यांना सांगितले. त्यानंतर सदरची कारवाई स्थगित करण्याबाबत मी जबाब दिल्याने कारवाई स्थगित करण्यात आली होती. त्या दिवसानंतर बडे पोलीस यांनी मला फोन केला नाही तसेच कुणाच्या हस्ते भेट घेण्यासाठी निरोप देखील दिलेला नाही. त्यामुळे माझी आता पुर्ण खात्री झाली आहे की, मी व माझा भागीदार मित्र नारायण बोरूडे यांचेवर गुन्हा दाखल न करण्यासाठी व आमचा जेसीबी जप्त न करण्यासाठी बडे  पोलीस यांनी मागितलेली 40000/- रूपये लाच रक्कम ते भविष्यात माझ्याकडुन स्विकारणार नाहीत.तरी लोकसेवक संजय जनार्दन बडे, पोलीस अंमलदार, उपविभागीय पोलीस अधिकारी, कार्यालय, शेवगाव  यांनी दि. 13/07/2022 रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान पंच नं.1 यांचेसमक्ष माझेकडे मी व माझा भागीदार मित्र नारायण बोरूडे यांचेवर गुन्हा दाखल न करण्यासाठी व आमचा जेसीबी जप्त न करण्यासाठी 50,000/-रुपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 40,000/-रुपये लाचेची मागणी करून लाचेची रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली म्हणुन संजय जनार्दन बडे, पोलीस अंमलदार, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, शेवगाव जि.अहमदनगर यांचे विरूध्द फिर्याद आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SUHAS BHAURAO CHAVAN(SI (Sub-Inspector)) / 15101000402SBCM8401 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): SUHAS BHAURAO CHAVAN
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): 15101000402SBCM8401

पोलीस ठाणे अंमलदार

पाथर्डी पो.स्टे. जि.अ.नगर